www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार

मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले  उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड  कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर  निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील  सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २  अंक : १७३ वा  रविवार दि. ०९ मार्च २०२५  किंमत : ४ रु  पृष्ठ : ४  RNI MAHMAR/2023/89514

दै. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर




**दैनिक युवक आधार**

जागतिक महिला दिनानिमित्त नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन कार्यालय व त्रिमूर्ती महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 11/03/2025 मंगळवार 4-00 वाजता अबोली महिला रिक्षा चालक , ट्रेनिंग स्कूल महिला सदस्य,रिक्षा चालक यांच्या कुटुंबातील महिला सदस्य व विविध सामाजिक संस्था महिला पदाधिकारी यांना कळविण्यात येते हळदीकुंकू समारंभ व महिला अधिकारी यांच्या हस्ते सन्मान आयोजित केला आहे तरी आपण सर्व महिलांनी उपस्थित रहावे ठिकाण उपप्रादेशिक परिवहन कार्यालय 4 था माळा (स्वर्गीय आर आर पाटील उद्यानाच्या बाजूला) से 13 नेरूळ नवी मुंबई.

## बौद्धिक अक्षम शाळेत कर्तबगार महिलांचा सन्मान

### डॉ.नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक अक्षम मुलांच्या शाळे तर्फे जागतिक महिला दिन साजरा



**दैनिक युवक आधार**

भारती आमले । मुख्य संपादक : ८ मार्च जागतिक महिला दिन सर्व जगभर महिलांचा सन्मान करून साजरा केला जातो.डॉ.नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक अक्षम मुलांच्या शाळेत अभिनव पद्धतीने जागतिक महिला दिन साजरा केला गेला. पनवेल परिसरातील स्वतःचा व्यवसाय व कार्यक्षेत्रात आघाडीच्या भूमिका निभावणाऱ्या व समाजातील उपेक्षित घटक म्हणून दुर्लक्षित केलेल्या विशेष शाळेला मदत करणाऱ्या पाच प्रतिभा संपन्न महिलांचा सन्मान चिन्ह, सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. यामध्ये विद्यार्थ्यांच्या पुनर्वसना करिता सातत्याने सहकार्य करणाऱ्या डॉ. समिधा गांधी,शाळेच्या उपक्रमात सहभागी होणाऱ्या विद्यार्थी व शिक्षक यांना प्रोत्साहन देणाऱ्या सौ.सलमा खान , विद्यार्थ्यांसाठी सातत्याने उपक्रम राबविणाऱ्या इनरव्हील क्लबच्या डॉ. वीणा मनोहर मॅडम, विद्यार्थ्यांना शाळेत सांस्कृतिक कार्यक्रमाच्या वेळेस वैयक्तिक व रोटरी क्लबच्या मार्फत खाऊ वाट्प करणाऱ्या दीपा पंजाबी मॅडम, विद्यार्थी व पालक यांच्यासाठी शिबीर व कार्यशाळा यांना सहकार्य करणाऱ्या लायन्स क्लबच्या चंद्रा बोरा मॅडम, या कर्तबगार महिलांचा त्यांच्या कार्यस्थळी जाऊन त्या करत असलेल्या कार्यासाठी तसेच विशेष शाळेसाठी करत असलेल्या मदतीसाठी कृतज्ञतेच्या भावनेतून शाळेच्या विद्यार्थिनी व महिला कर्मचारी यांनी डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन तर्फे महिला दिनाच्या शुभेच्छा देऊन सत्कार करण्यात आला.



**ठाणे** : दिवा रेल्वे स्थानकात ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त शिवसेना उपशहरप्रमुख तथा मा.नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांच्या संकल्पनेतून दिवा रेल्वे स्थानकावर शिवदूत महिलांच्या वतीने रेल्वे प्रवासी मुली व महिलांना पुष्प देऊन महीला दिनाच्या शुभेच्छा देत महिला दिन साजरा करण्यात आला.

**(फोटो - अमित जाधव दैनिक युवक आधार )**

## मराठीचा अवमान करणाऱ्या जोशींचा ठाकरे शिवसेनेने केला निषेध

**दैनिक युवक आधार**

**लातूर वार्ताहर** : मराठी भाषेविषयी वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे भैय्याजी जोशी यांचा लातूर जिल्हा शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने येथील महात्मा गांधी चौकात शुक्रवारी (दि.७) निदर्शने करून जाहीर निषेध करण्यात आला. शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ नेते भैयाजी जोशी यांनी मुंबईत येणाऱ्यांनी मराठी शिकलीच पाहिजे, असे नाही, असे वक्तव्य करून मराठी भाषेचा व मराठी माणसाचा अपमान केला आहे. या वक्तव्याचा निषेध म्हणून जिल्हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांच्या नेतृत्वात शुक्रवारी लातूरच्या महात्मा गांधी चौकात जोशी यांच्या विरोधात घोषणाबाजी देत




निषेध आंदोलन करण्यात आले. भैय्याजी जोशी यांनी केलेल्या वक्तव्याबद्दल जाहीर माफी मागावी, अशी मागणी संतोष सोमवंशी यांनी यावेळी बोलताना केली.या आंदोलनात शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांच्यासह शिवसेना सहसंपर्कप्रमुख नामदेव चाळक, महानगर प्रमुख सुनील बसपुरे, महिला जिल्हा संघटक सौ. सुनीता चाळक, उपजिल्हाप्रमुख बालाजी जाधव, सी. के. मुरळीकर, शहरप्रमुख विष्णू साठे, रमेश माळी, एस. आर. चव्हाण, बसवराज मंगरूळे,माधव कलमुकले, शंकर रांजणकर, विलास लंगर, कैलास पाटील, दत्तु मोरे, भास्कर माने, सुरज बाहेती, मारुती सुर्यवंशी, मारुती सांवत, राजू कतारे, राजू घटमल, रोहित दोपारे, गणेश गंगणे, प्रदीप बनसोडे, विष्णू कांबळे, कृष्णा जाधव, प्रेम शाहीर, राम चोथवे, सोमनाथ आग्रे, परमेश्वर कांबळे, अभिजित गायकवाड यांचेसह शिवसेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत २ घरकुल मंजूर झाले असून उसर्ली खुर्द ग्रुप ग्रामपंचायत यांच्या माध्यमातून भूमिपूजन करण्यात आले




**दैनिक युवक आधार**

**सुरेश भोईर (कार्यकारी संपादक)** : उसर्ली खुर्द ग्रुप ग्रामपंचायतीच्या अंतर्गत असणाऱ्या गरीब गरजू लोकांना प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत दोन घरकुल मंजूर झाले असून याचा लाभ लक्ष्मी वाघमारे व भारती वाघमारे यांना देण्यात आला आहे दिनांक ०८/०३/२०२५ रोजी भूमिपूजन करण्यात आले यावेळी उपस्थित अनिता नितीन भगत (प्रभारी सरपंच), मुकेश दिलीप भगत (सदस्य), अमित गजानन भगत(सदस्य), अर्चना निलेश भगत (सदस्या), अतुल आनंदा तांबे(सदस्य) , अरुण एकनाथ वाघमारे (सदस्य ) , स्वाती संजय भगत (सदस्या) , रेवन्नाथ मारुती ढेरे (ग्रामपंचायत अधिकारी) व ग्रामस्थ नितीन कृष्णा भगत, संजय बाळाराम भगत, मच्छिंद्र आत्माराम पाटील , जितेंद्र एकनाथ भगत , जयवंत नामदेव भगत , विनायक येवले , गणेश काळे, मंगेश ढवळे आदी उपस्थित होते

## जप्ती वॉरंट बजावण्यास गेलेल्या बेलीफास लाथाबुक्क्यांनी मारहाण

**दैनिक युवक आधार**

**निफाड तालुका प्रतिनिधी । राजेश भडांगे**

**विंचूर** : फौजदारी न्यायालयाचे जप्ती वॉरंट बजवण्यास गेलेल्या बेलीफास लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्याचा प्रकार घडला आहे. याबाबत चंद्रशेखर वामन अहिरे, वय ५५,धंदा बेलीफ, निफाड कोर्ट रा.गुजरात नगर, चांदवड यांनी निफाड पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दि.७ मार्च रोजी दुपारी ३.३० वाजेच्या सुमारास दिवाणी व फौजदारी न्यायालय निफाड यांचे कडील आर्बिटेशन दरखास्त नंबर ८०८/२०१७ मधील निशाणी १२ व १३ चे जंगम जप्ती वॉरंट मे.कोर्टाचे आदेशानुसार बजावणी कामी मी, तसेच श्रीराम फायनान्स लि.तर्फे वसुली अधिकारी श्रावण प्रल्हाद गायकवाड रा.शिवनेरी कॉलनी, बालाजी मंदीराजवळ पिंपळगाव ब.असे आम्ही प्रतिवादी भावनाथ रावसाहेब शिंदे रा.रौळस यांचेकडे जंगम जप्ती वॉरंट बजावणी करीता गेलो असता, भावनाथ शिंदे यांनी प्रतिवादी बाळासाहेब रघुनाथ पगारे यांना तेथे बोलावुन घेतले. तेव्हा दोघे जण आम्हाला म्हणाले की, तुम्ही खरंच सरकारी माणसे आहात का? तुमचे ओळखपत्र कुठे आहे? असे बोलून आम्हाला मोठमोठ्याने शिवीगाळ करू लागले. 'आम्ही तुम्हाला जंगम जप्ती करु देणार नाही तसेच कोर्टातील पैसे आम्ही भरणार नाही' असे म्हणाले. तेव्हा आम्ही त्यांना समजावुन सांगत असतांना त्यांनी आमचे काही एक ऐकुन न घेता मला तसेच माझे सोबतचे श्रावण गायकवाड यांना लाथा बुक्यांनी मारहाण करुन धक्काबुक्की केली व 'तुम्ही येथुन निघुन जा, कोर्ट काय करणार आहे ते आम्ही बघुन घेऊ, तुम्ही येथुन गेले नाही तर तुमचे एक एकाचे तंगडे तोडू' असा दम दिला. त्यांचे फिर्यादीवरून आरोपींच्या विरोधात निफाड पोलीस ठाण्यात गु.र.न. कलम ८३/२०२५ भा.न्या.सं. कलम १३२,११५, ३ ५२.३५१(२),३(५)१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पो.निरीक्षक गणेश गुरव यांचे मार्गदर्शनाखाली पो.उपनिरीक्षक बाविस्कर अधिक तपास करीत आहेत.

## पनवेल या ठिकाणी मोहटा देवी मंदिराची उभारणी

### मूर्ती प्राणप्रतिष्ठान भव्य सोहळा संपन्न होणार

**दैनिक युवक आधार**

**आष्टी प्रतिनिधी** : पनवेल येथे सेक्टर 5 मध्ये बीड व अहिल्यानगर व नवी मुंबई पनवेल या ठिकाणच्या स्थानिक भाविकांनी मोहटा देवी मंदिराची उभारणी केली असून या ठिकाणी मोहटा देवी मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा दि 14 एप्रिलला संपन्न होत आहे. नवी मुंबई पनवेल या ठिकाणी बीड व अहिल्यानगर या जिल्ह्यातील अनेक लोक रोजगारानिमित्त त्या ठिकाणी स्थायिक झालेले आहेत या स्थायिक झालेल्या लोकांची पाथर्डी तालुक्यातील मोहटा देवीवर अपारशी श्रद्धा आहे या ठिकाणी प्रत्येक वेळेस दर्शनासाठी येणे शक्य होत नसल्यामुळे या भाविकांनी नवीन पनवेल सेक्टर 5 येथे मोहटा देवी चॅरिटेबल ट्रस्ट स्थापन करून या ठिकाणी मोठा देवी रेणुका माता मंदिर गेल्या अनेक वर्षापासून उभारले आहे या ठिकाणी नित्यनियमाने प्रत्येक वर्षी दसऱ्यामध्ये मोठ्या प्रमाणावर उत्सव साजरा केला जातो या परिसरातील अनेक भाविक मोहटा देवीवर श्रद्धा असणारे या ठिकाणी दर्शनासाठी येत असतात. या ठिकाणी सर्वांच्या लोकवर्गणीमधून सुस्थितीत असे मंदिर उभारण्यात आलेले आहे. या मंदिरामध्ये नवीन मोहटादेवी मूर्तीची प्राणप्रतिष्ठा होणार असून या सोहळ्याचे साक्षीदार होण्याचे आवाहन ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.मंदिराची उभारणी मोहटादेवी मूर्ती प्राणप्रतिष्ठा हा सर्व खर्च लोकवर्गणीतून करण्यात येत असून स्वईच्छने या परिसरातील लोक या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर देणगी देत आहे. लवकरच या ठिकाणी मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न होत असून मोहटा या ठिकाणी पाथर्डी तालुक्यातील मोहटा या ठिकाणी असणारी मोहटा देवीची मूर्ती अशाच प्रकारे मूर्ती या ठिकाणी बसवण्यात येणार असल्याची माहिती ट्रस्टच्या वतीने देण्यात आली आहे.मोहटा देवीची महिमा पाथर्डी शहरापासून सुमारे नऊ किलोमीटर अंतरावर पूर्व भागातील उंच डोंगरावर मोहटादेवीचे स्वयंभू स्थान आहे. देवस्थान समितीने लोकवर्गणीतून कोटयावधी रूपये खर्चुन भव्य मंदिर उभारले आहे. देशातील देवी मंदिरापैकी सर्वात मोठे आकर्षक मंदिर सुध्दा प्रेक्षणीय असून संपूर्ण मंदिराची रचना श्री यंत्रकार आहे. आश्विन शुद्ध प्रतिप्रदेपासून कोजागिरी पौर्णिमेपर्यंत अशी पंधरा दिवस यात्रा येथे चालते. नवसाला पावणारी अशी या मोहटा देवीची ख्याती आहे. जागांच्या कल्याणासाठी रेणुकादेवी येथे प्रकट झाली आणि मोहटा देवी म्हणून प्रसिद्ध झाली अशी आख्यायिका सांगितली जाते.या पाथर्डी तालुक्यातील मोहटा गावी असणाऱ्या देवीचे दर्शनाला येणे शक्य होत नसल्याने या भाविकांना पनवेल या ठिकाणी दर्शन व्हावे हा उद्देश समोर ठेवून या ठिकाणच्या भाविकांनी एकत्रित येऊन पनवेल या ठिकाणी मोहटा देवी च्या मंदिराची उभारणी केली आहे.



## करंजाडे पाणीप्रश्नावर खासदार. श्रीरंगजी बारणे यांची भेट

**दैनिक युवक आधार**

**करंजाडे वार्ताहर** : करंजाडे पाणीप्रश्नावर खासदार. श्रीरंगजी बारणे यांची भेट घेऊन करंजाडे पाणीप्रश्नावर सविस्तरपणे चर्चा केली व विशेषत्वाने भीषण पाणीटंचाईची तीव्रता त्यांच्या लक्षात आणुन दिली असता तत्काळ सिडकोचे अधिकारी गायकवाड व एमजेपीचे वायदंडे यांच्याशी फोनवरून चर्चा केली व तातडीने प्रश्न मार्गी लावण्याची सुचना दिली. एमजेपी अधिकाऱ्यांनी पाण्याच्या प्रेशरमध्ये आज सुधारणा झाली असुन फुटलेल्या पाईपलाईनचे काम पूर्ण झाले यानंतर व्यवस्थित पाणीपुरवठा केला जाईल अशी माहिती दिली. यावेळी शिवसेना तालुका प्रमुख श्री. रघुनाथ पाटील, उपतालुका प्रमुख चंद्रकांत गुजर, करंजाडे पीपल्स फाउंडेशनच्या वतीने मिरेंद्र शहारे, राजाभाऊ नालावडे , नवनाथ चवरे, अनिकेत चाळके, तुलसी गौतम, संदीप जाधव उपस्थित होते.



# "महिला सक्षमता, तर देश सक्षम" : सौ.आम्रपाली आघम

**दैनिक युवक आधार**
**रिसोड वार्ताहर । रणजीत सिंह ठाकुर**

**"8 मार्च आंतरराष्ट्रीय महिला दिन विशेष"**

महिला सक्षमता, तर देश सक्षम" हे वाक्य एक अत्यंत महत्त्वपूर्ण विचार आहे. असे उद्गार सामाजिक कार्यकर्त्या तथा कोंढाळा महाली ग्रामपंचायत सदस्य सौ.आम्रपाली सुरेश आघम यांनी जागतिक महिला दिनाच्या संदर्भात महिलांच्या सक्षमीकरणावर जोर देत केले आहे. त्यांचा विश्वास आहे की, जेव्हा महिलांना त्यांच्या संपूर्ण सामर्थ्याचा उपयोग करण्यासाठी योग्य संधी मिळतात, तेव्हा त्या आपल्या कुटुंब, समाज आणि देशाच्या विकासात मोठा योगदान देऊ शकतात.आंतरराष्ट्रीय महिला दिन (8 मार्च) हा दिवस महिलांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय योगदानाची ओळख आणि महिलांच्या समान हक्कांसाठी लढा देण्याच्या महत्त्वाच्या उद्दिष्टांसाठी साजरा केला जातो. या दिवशी महिला सक्षमीकरण आणि समानतेसाठी जागरूकता वाढवली जाते. त्याकरिता प्रत्येक महिलांना प्रत्येक क्षणी संधी उपलब्ध करून देणे अत्यंत गरजेचे आहे.

महिलांना त्यांच्या स्वातंत्र्याचा आणि हक्कांचा पुरेपूर वापर करण्याची संधी दिली पाहिजे. त्यांच्या दृष्टिकोनानुसार, महिलांचा सशक्तीकरण हा फक्त एक व्यक्तिगत बाब नसून, समाजाचा आणि देशाचा व्यापक बदल घडवून आणणारा एक प्रभावी घटक आहे.त्यांच्या विचारानुसार, महिलांना योग्य शिक्षा, रोजगार संधी, आणि समाजात समान हक्क दिले गेले, तर संपूर्ण देशाचा विकास होईल आणि एक समतामूलक समाज निर्माण होईल."महिलाही प्रत्येक क्षेत्रात पुढे असून; महिला जशा घर चालवू शकता तशा देशाही चालू शकतात!" हा विचार अत्यंत सामर्थ्यवान आहे आणि महिला सशक्तीकरणाच्या संदर्भात महत्त्वपूर्ण आहे. महिलांनी घर चालवले आहे. आणि त्या घरात असलेल्या प्रत्येक गोष्टीला नीट व्यवस्थापित केले आहे, त्याचप्रमाणे त्या देश किंवा समाजाचं नेतृत्व देखील सक्षमपणे करू शकतात. महिलांमध्ये एक नैतिक आणि मानसिक ताकद आहे, जी त्यांना घरातील व्यवस्थापन, कुटुंबाची काळजी, शिक्षण, आर्थिक योजना यासारख्या अनेक गोष्टी प्रभावीपणे हाताळण्याची क्षमता देते. त्याचप्रमाणे, त्यांना जर योग्य संधी आणि सत्तेची गुरुकिल्ली दिली गेली, तर त्या देशाच्या आर्थिक, राजकीय, सामाजिक सर्वच क्षेत्रांमध्ये प्रभावी योगदान देऊ शकतात.महिलांना समान संधी आणि सत्तेची गुरुकिल्ली देणे गरजेचे आहे, कारण यामुळे त्यांना स्वतःच्या क्षमतेनुसार निर्णय घेण्याची स्वातंत्र्य मिळते, आणि त्याच्या परिणामी त्या समाजात आणि देशात सकारात्मक बदल घडवू शकतात. जर महिलांना योग्य शिक्षा, आर्थिक स्वतंत्रता, आणि समाजात समान हक्क दिले गेले, तर त्या समाजाचा आणि देशाचा समग्र विकास साधता येईल.आम्रपाली आघम या वेळी पुढे वृत्तपत्राच्या माध्यमातून बोलताना म्हणाले की. महिलांना सशक्त करण्यासाठी त्या आपल्या आवडीनुसार आणि क्षमतेनुसार पुढे येऊ शकतात. जर त्यांना योग्य संधी मिळाल्या, तर त्या प्रत्येक क्षेत्रात अत्यंत प्रभावीपणे काम करू शकतात आणि समाजात समानता, न्याय, आणि समृद्धी साधता येईल. त्यांचा असा विश्वास आहे की, जर महिलांना सशक्त बनवले गेले, तर ते केवळ त्यांच्यापुरतेच नाही तर संपूर्ण देशासाठी एक शक्ती ठरतील. असे उद्गार यावेळी राजा प्रसेनजीत अल्पसंख्यांक शिक्षणा बहुउद्देशीय संस्था केकतउमरा प्रतिनिधी तथा सामाजिक कार्यकर्ते ग्रामपंचायत सदस्य कोंढाळा महाल्ली सौ.आम्रपाली सुरेश आघम यांनी केले आहे.



**शब्दांकन**
**सौ.आम्रपाली सूरेश आघम**
**सामाजिक कार्यकर्त्या तथा**
**ग्रामपंचायत सदस्य**
**कोंढाळा मा. ता जि. वाशिम**

# माता पालक वर्गाने केला आनंदात महिला दिन साजरा



**दैनिक युवक आधार**

**उरण प्रतिनिधी । हेमाली पाटील** : हुतात्मा परशुराम रामा पाटील शिक्षण संस्थेचे पुंडलिक रामा पाटील इंग्लिश स्कुल पाणदिवे, उरण येथे महिला दिन सोहळा मोठया उत्साहात पार पाडला.. 8 मार्च हा दिवस 'आंतरराष्ट्रीय महिला दिन' म्हणून संपूर्ण जगभरात साजरा केला जातो. आणि याचेच औचित्य साधून शाळेत माता पालक वर्गाने मोठ्या उत्साहात महिला दिन साजरा केला. या कार्यक्रमाचे शुभारंभ देवी सरस्वतीच्या मूर्तीचे पूजन करून करण्यात आले. या कार्यक्रमासाठी पत्रकार,वकील,शिक्षिका, समाजसेविका कुमारी रणीता जयराम ठाकूर( कोप्रोली )या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्याचप्रमाणे सामाजिक कार्यकर्त्या, वकील अशा शाळेच्या मार्गदर्शिका सौ. ममता भालचंद्र पाटील यांनी देखील उपस्थित महिला वर्गांना आपल्या मनोगतातून मार्गदर्शन केले.

दरवर्षी महिला दिनानिमित्त शाळेमध्ये वेगवेगळे मनोरंजनात्मक कार्यक्रम राबविले जातात. महिला दिनानिमित्त शाळेत येणाऱ्या प्रत्येक माता भगिनींना हळदीकुंकू लावून व पुष्प देऊन त्यांचे सहर्ष स्वागत केले. त्याचप्रमाणे संगीत खुर्ची,सुई-धागा, पोटॅटो रेस,हिट द टार्गेट,बॉल इन बकेट अशा विविध खेळांचे आयोजन देखील करण्यात आले . माता पालकांनी या खेळांमध्ये मोठ्या संख्येने सहभाग घेतला.प्रत्येक खेळामध्ये तीन विजेत्या घोषित करून त्यांना सुंदर असे पारितोषिक देखील देण्यात आले.कार्यक्रमास आवर्जून उपस्थित असणाऱ्या प्रमुख पाहुण्या आणि मान्यवर यांना शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती योगिता गावंड मॅम यांनी शाळेतर्फे सुंदर भेटवस्तू भेट म्हणून दिल्या. शाळेचे चेअरमन सन्माननीय श्री. प्रकाश पाटील सर यांच्या नेतृत्वाखाली या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

हा सोहळा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी पूर्व प्राथमिक, प्राथमिक आणि माध्यमिक विभागाच्या प्रमुख, सर्व शिक्षक –शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, इयत्ता नववीच्या विद्यार्थिनी या सर्वांनी मोलाचे सहकार्य केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन शाळेतील शिक्षिका सौ.हेमाली पाटील यांनी केले. तसेच त्यांनी आपली स्वरचित ' माहेर' ही कविता सादर करून कार्यक्रमाची सांगता केली.

# प्रगत देशांपेक्षा विचाराने भारत प्रगत : वपोनि स्मिता ढाकणे

## वाहन चालविताना नियमांचे पालन करणे आवश्यकः आरटीओ अधिकारी विजया चामे

## अबोली महिला रिक्षा चालक संघटनेचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**संतोष आमले । संपादक** : दरवर्षी 8 मार्च रोजी साजरा केला जाणारा आंतरराष्ट्रीय महिला दिनाचा इतिहास 20 व्या शतकाचा आहे, जेव्हा त्याची सुरुवात अमेरिकन समाजवादी आणि कामगार चळवळींपासून झाली. त्या काळातील महिला कमी कामाचे तास, चांगले वेतन आणि मतदानाचा अधिकार यासारख्या त्यांच्या हक्कांसाठी लढत होत्या. हा दिवस पहिल्यांदा 1911 मध्ये साजरा करण्यात आला. 1977 मध्ये संयुक्त राष्ट्रांनी आंतरराष्ट्रीय महिला दिनाला मान्यता दिली आणि तेव्हापासून संयुक्त राष्ट्रांच्या सदस्यांनी दरवर्षी 8 मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली. मात्र भारतात राज्य घटनेमध्येच महिलांना सर्व अधिकार देण्यात आले होते. त्यामुळे प्रगत देशांपेक्षा विचाराने भारत देश प्रगत असल्याचे त्यांनी सांगितले. त्या अबोली महिला रिक्षा चालक संघटनेच्या 7 व्या वर्धापनदिनानिमित्त बोलत होत्या. डी मार्ट समोरील मैदानात साजरा झालेल्या कार्यक्रमास आरटीओ अधिकारी विजया चामे, पाली देवद सुकापूरच्या सरपंच सौ. योगिता पाटील, अबोली महिला रिक्षा चालक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संतोष भगत, उपाध्यक्ष सुलोचना भगत, सचिव संतोष सुतार, सहसचिव आशा घालमे, खजिनदार ललिता राऊत, सहखजिनदार सुनिता जाधव या पदाधिकाऱ्यांसह महिला सदस्य तसेच







सामाजिक कार्यकर्ते रविंद्र पाटील व शरद मोकल आदी उपस्थित होते.

त्या पुढे म्हणाल्या की, संघटना म्हटले की एकजुटीने काम करणे आले. तुम्ही सर्व महिला एकजुटीने काम करा. एकजूट राहिल्यास संघटनेला बळकटी मिळते. संघटनेची ओळख निर्माण करण्यासाठी सर्वांनी एक सारखा युनिफॉर्म परिधान करणेही गरजेचे आहे. संघटना चालवायची म्हणजे त्याला आर्थिक पाठबळ लागते त्यामुळे प्रत्येक सदस्याने दरमहा काही रक्कम संघटनेसाठी दिल्यास कार्यक्रम करण्यास त्याचा हात भार लागत असल्याचे सांगत त्यांनी सर्व उपस्थित महिला सदस्यांना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी आरटीओ अधिकारी विजया चामे यांनी महिलांना मार्गदर्शन करताना सांगितले की, आपण रिक्षा चालवताना सावधगिरी बाळगली पाहिजे. अपघात हे काही क्षण दुर्लक्ष झाल्याने घडतात. भारतात अपघाताचे प्रमाण खूप मोठे आहे. प्रत्येकाने काळजीपूर्वक नियमांचे पालन करुन वाहन चालवल्यास नक्कीच आपण अपघात टाळू शकतो. तसेच आपल्या मुलांना दुचाकी वापरण्यासाठी देताना त्यांना हेल्मेट घालण्याची सक्ती करणे गरजेचे आहे. दुचाकीचा अपघात झाल्यास हेल्मेटमुळे डोक्याला दुखापत होत नसल्याने प्राण जाण्याची शक्यता कमी होते. महिला रिक्षा चालकांना आरटीओ संदर्भात काही कामे असतील तर त्यांनी नक्की संपर्क साधा त्यांच्या प्रश्नांचे निराकारण करण्यात येईल असे सांगत त्यांनी महिलांना महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

अबोली महिला रिक्षा संघटनेच्या वर्धापन दिना निमित्त सर्व महिला सदस्यांना पाली देवद सुकापूरच्या सरपंच सौ. योगिता पाटील यांच्या हस्ते साडयांचे वाटप करण्यात आले.यावेळी अध्यक्ष संतोष भगत यांनी सांगितले की, 2018 रोजी महिला दिनीच या संघटनेची स्थापना करण्यात आली. आज संघटनेचा 7 वा वर्धापन दिन साजरा करताना अतिशय आनंद होत आहे. या सात वर्षात संघटनेची घौडदौड सुरु आहे ती यापुढेही अशीच सुरु राहिल असे सांगून सर्व उपस्थित सदस्यांना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

# खारघर मध्ये मोफत अधारकार्ड शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**खारघर वार्ताहर** : खारघर परिसरात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपशहर प्रमुख श्री नंदु वारुंगसे यांच्यामार्फत मोफत आधार कार्ड शिबिराचे आयोजन गेल्या अनेक महिन्यांपासून प्रत्येक सोसायटीत करण्यात येत आहे. आधार कार्ड आता प्रत्येक गोष्टीसाठी अत्यावश्यक बनले आहे ओळखीसाठी सर्वत्र आधार कार्ड मागितले जाते. आधार कार्ड चे महत्व वाढत असल्याने भारत सरकारने मोठे निर्णय घेतले आहे.ज्यामध्ये तुमच्याकडे आधार कार्ड नसेल तर कामे करणे कठीण होईल इतर कोणीही हे कार्ड वापरु शकत नाही. तर रेशन कार्डसह इतर अनेक प्रमाणपत्रांमध्ये अनेक प्रकारच्या चुका झाल्या आहेत. पासपोर्ट काढण्यासाठी आधार अनिवार्य करण्यात आला आहे. सर्वच बँकांमध्ये अकाउंट खोलण्यासाठी आधार कार्ड अनिवार्य करण्यात आले आहे. लहान मुलांना स्कूल मध्ये प्रवेश घेण्यासाठी प्रथम आधार कार्ड शिवाय ऍडमिशन मिळणं कठीण झालं आहे. अनेक शासनाच्या सुविधा घेण्यासाठी आधार कार्ड शिवाय शक्य नाही व आधार कार्ड मध्ये बऱ्याचशा चुका असल्यामुळे त्या सुधारण्यासाठी नागरिकांना खूपच त्रास होत असल्यामुळे प्रत्येक सोसायटीमध्ये मोफत कॅम्प लावून नागरिकांना शिव सेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपशहर प्रमुख श्री नंदु वारुंगसे हे स्वता कॅम्प लावलेल्या ठिकाणी उपस्थित राहुन सुविधा उपलब्ध करुन देत आहेत.



# कर्जत हेरिटेज रिसॉर्टवर जनजागृती सेवा संस्थेच्यावतीने महिला दिन साजरा

**दैनिक युवक आधार**

**कर्जत प्रतिनिधी । गुरुनाथ तिरपणकर** : महिला या लक्ष्मी,सरस्वती,दुर्गा अशा देवतांपासून ते राणी अहिल्यादेवी,सावित्रीबाई,बहिणाबाई,सिंधुताई अशा मायभगिनींपर्यंत सर्व रुपांमधुन मानवतेच्या विश्वाला तीर्थस्वरुप करणा-या स्त्री शक्तीचाच एक वास्तव अंश आहेत.८मार्च हा सर्वत्र जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो,त्याच अनुषंगाने जनजागृती सेवा संस्थेच्यावतीने कर्जत हॅरिटेज रिसॉर्टवर जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी कर्जत हेरिटेज रिसॉर्टच्या संचालिका विजयालक्ष्मी केशरवाला आणि सौ.प्रिती प्रदिप जोशी यांच्या हस्ते वुमन डे स्पेशल कापण्यात आला.याप्रसंगी सौ.प्रिती जोशी यांच्या हस्ते विजयालक्ष्मी केशरवाला यांना संस्थेचे सन्मानपत्र व संस्थेचा अहवाल प्रदान करण्यात आला.तसेच प्रिती प्रदिप जोशी,वंदना अशोक लंगडे,गंधाली गुरुनाथ तिरपणकर,ललिता ज्ञानेश्वर माळवदकर,मनिषा संजय वगळ,प्रिया प्रमोद जोशी,ज्योती पवार,प्रज्ञा शिंदे,अरुणा मुकणे यांना विजयालक्ष्मी केशरवाला यांच्या हस्ते संस्थेचा अहवाल,"आकर्षक सन्मानपत्र"गुलाबपुष्प प्रदान करुन या महिलांचा यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सौ.प्रिती जोशी,सौ.प्रिया जोशी,सौ.वंदना लंगडे यांची समोयचित भाषणे झाली.जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी प्रास्ताविक केले.तसेच संस्थेचे जेष्ठ सदस्य प्रदिप जोशी यांनी सर्व समावेशक सकारात्मक मार्गदर्शन करुन सर्वांना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.



# विश्वनिकेतन इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**खालापूर वार्ताहर** : कुंभवली खालापूर येथील विश्वनिकेतन इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये ६ व ७ मार्च २०२५ या कालावधीत "इमर्जिंग ट्रेंड्स इन कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग"* या विषयावरील दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय संशोधन परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

या परिषदेचे उद्घाटन प्रमुख पाहुणे डॉ.नरेशकुमार हराळे, सीनियर व्हाईस प्रेसिडेंट एसबीआय यांच्या हस्ते झाले.उद्घाटनाच्या वेळी व्यासपीठावर श्री मकरंद माने सीनियर प्रेसिडेंट ओरॅकल कंपनी, डॉ. ओम प्रकाश टेंभुर्णे एक्झिक्यूटिव्ह पब्लिशर स्प्रिंगर नेचर ग्रुप, विश्वनिकेतन इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ. बी आर पाटील, उपप्राचार्य डॉ.शंकर कदम, प्रो. शिवानी अग्रवाल आणि कॉन्फरन्स कन्वेनर डॉ. अंकुश पवार उपस्थित होते.

वेलकम भाषणामध्ये डॉ. अंकुश पवार यांनी आंतरराष्ट्रीय परिषदेबद्दल आढावा सादर केला. प्राचार्य डॉ बी आर पाटील यांनी आलेल्या पाहुण्यांचे स्वागत करून कॉलेज बद्दल माहिती दिली.

अध्यक्षीय भाषणात डॉ. नरेशकुमार हराळे यांनी कॉम्प्युटर सायन्स अँड इंजीनियरिंग मध्ये इमर्जिंग ट्रेंड्सचे असलेले महत्त्व, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, सायबर सिक्युरिटी याबद्दल उपस्थित प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलं. श्री मकरंद माने यांनी कंपनीमध्ये वापरत असलेल्या इरपी सिस्टीम बद्दल आणि जॉब बद्दल मार्गदर्शन केले. किनोट स्पीकर डॉ. ओमप्रकाश टेंभुर्णे यांनी पब्लिकेशन चे महत्व उपस्थितांसमोर मांडले.

या कॉन्फरन्समध्ये १२० प्रबंध ऑफलाईन आणि ऑनलाइन च्या माध्यमातून सादर करण्यात आले. ही कॉन्फरन्स आर्टिफिशल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग, इंटरनेट ऑफ थिंग्स, सिस्टीम सिक्युरिटी, रिसेंट ट्रेंड इन इंडस्ट्री या विषयावर आधारित होती.ही कॉन्फरन्स यशस्वी करण्यात को-कॅन्वेनर प्रा. अश्विनी गारोळे, प्रा. स्नेहा निंबारे, प्रा. महेश सुतार, प्रा. हेमंत कांबळे, प्रा. अक्सा सरनाईक, प्रा. रोहन पाटील, प्रा. ऋतिका मोहिते, प्रा. सानिका सुतार यांनी मोलाची भूमिका बजावली.




# जागतिक महिला दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघाच्या वतीने विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांचा सन्मान

**दैनिक युवक आधार**

**पुणे वार्ताहर** : जागतिक महिला दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघाच्या अजित पवार गटाच्या वतीने पुणे शहरात विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांचा सन्मान भवानी पेठ येथील भवानी माता मंदिरामध्ये करण्यात आला यामध्ये कॅन्टोन्मेंट रुग्णालयाचे वरिष्ठ डॉ,अनुराधा डोळस, पुणे महानगरपालिकेतील अधिकारी अंजली सालार, शिक्षिका सुषमा अग्रवाल, सामाजिक कार्यकर्त्या रोशन आरा पटेल, जिम ट्रेनर अमृता जेधे, कुरेशी समाज महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षा परवा कपासे या महिला भगिनींना राष्ट्रवादी काँग्रेस पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा अध्यक्ष नरेंद्र जाधव यांच्या हस्ते शाल पुष्परोप व साडी चोळी देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला, यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पुणे शहर महिला आघाडी सरचिटणीस शलाका



पाटील, रीना अडागळे, नीता अडागळे, निर्जला गायकवाड, अर्चना वाघमारे, अर्पणा कुंभार, प्रज्ञा वाघमारे, कुरेशी रोशन आरा, महेंद्र लालबिगे, दिनेश अर्धाळकर, दिनेश परदेशी, शब्बीर शेख, राहुल तांबे, अनिल अग्रवाल आदि यावेळी उपस्थित होते

# जागतीक महिला दिनी आनंदवाडी ग्रामपंचायतीने केला महिलांचा सन्मान




**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर । लातुर**

शिरूर अनंतपाळ : तालुक्यातील आनंदवाडी येथील ग्रामपंचायत कार्यालयाने आनंदवाडी जागतिक महिला दिनानिमित्त कर्तत्वान महिलांचा यशोचीत सन्मान केला.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन शिरूरआनंतपाळ येथील ग्रामिण रूग्नालयाच्या डॉ. गिता जगताप होत्या. गावातील उद्योजक युवक महिला सुमित्रा सुदर्शन धूळे यांचा ग्रामपंचायच्या वतीने शाल श्रीफळ भेट वस्तू देऊन सत्कार करण्यात आला . या महिलेनी ग्रामिण भागात बचत गटाच्या माध्यमातून व उमेद च्या सहकार्यने छोटासा उद्योग उभारून महिलाही कूठे कमी नाहीत हे दाखवून दिले.त्या कार्याची दखल घेवून त्यांचा सन्मान करून पूढिल कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या. या प्रसंगी सरपंच भागवत वंगे, उपसरपंच व्यंकट कल्ले, माजी सरपंच सूनिता बळवंत शिरूरे, बचत गटाच्या प्रेरक अनूसया शिरूरे, वैभव डोंगरे, ग्रामपंचायत कर्मचारी रंजित मरे, व गावातील महिला उपस्थित होत्या .

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

द•ख•ल

## सारोळा गावात शेतजमिनीत बेकायदेशीर नमुना नंबर 8अ तयार– शेतकऱ्याची तहसीलदारांकडे तक्रार

दैनिक युवक आधार
**प्रतिनिधी । योगेश पालोदकर**

**सिल्लोड** : तालुक्यातील सारोळा गावातील गट नंबर ६५५ या शेतजमिनीत ग्रामपंचायत हद्दीत नोंदी करून बेकायदेशीर नमुना नंबर ८अ तयार झाल्याची तक्रार एका शेतकऱ्याने तहसीलदारांकडे केली आहे. संबंधित शेतकरी यांनी या प्रकरणात नमुना नंबर ८अ तयार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.तहसीलदारांना दिलेल्या अर्जात तक्रारदाराने नमूद केले आहे की, माझ्या मालकीच्या जमिनीत कोणतीही पूर्वपरवानगी न घेता श्री. दत्तू शेषराव गोरे, रा. सारोळा यांच्या शेतजमिनीत नामे संजय सांडू काळे यांच्या नावाने नमुना नंबर ८अ तयार केला आहे. ही बाब कायद्याच्या दृष्टीने अयोग्य असून, यामुळे शेतकऱ्याला अनेक अडचणींचा सामना करावा लागु शकतो."माझ्या ग्रामपंचायत नोंद असलेली माझ्या मालकीची व ताब्यातील कोणतीही परवानगी न घेता नमुना नंबर ८अ तयार करण्यात आला आहे. त्यामुळे मला भविष्यात अडथळा निर्माण होऊ शकतो. प्रशासनाने तत्काळ कारवाई करून माझा हक्क मला मिळवून द्यावा," असे अर्जदाराने तहसीलदारांना सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे.




जागतिक महिला दिना निमित्त जिल्हा परिषद शाळा, वहाली येथे महीला दिन साजरा करण्यात आला. या वेळी शाळेच्या शिक्षिका नजमा शेख मॅडम, गुंड मॅडम यांच्या सत्कार सौ.स्वाती संग्राम भैय्या सरोदे यांनी तसेच सर्व पालक मातांनी केला. या बहुसंख्येने महिला पालक भगिनींनी उपस्थित होत्या.
(छायाचित्र-शेख महेशर ताहेर, पाटोदा.दैनिक युवक आधार )

## कल्पवृक्ष कडून मोफत आरोग्य शिबिर



दैनिक युवक आधार
**तृप्ती भोईर । उरण प्रतिनिधी** : ८ मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो.हा दिवस महिलांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी त्यांच्या कर्तुत्वाचा गौरव करण्यासाठी जगभर साजरा केला जातो.हे सारे करीत असताना महिलांचे आरोग्य हि उत्तम असणे फार महत्त्वाचे आहे या अनुषंगाने, आजच्या या जागतिक महिला दिनानिमित्त दिनांक ८ मार्च रोजी कल्पवृक्ष द्रोणागिरी कडून महिलांसाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.कल्पवृक्ष स्टार होम्स सेक्टर ५२ द्रोणागिरी उरण येथे सकाळी ९ ते १ वाजेपर्यंत हे आरोग्य शिबिर ठेवण्यात आले होते. यावेळी महिलांकरिता संपूर्ण शरीर चिकित्स्या चाचण्या ठेवण्यात आल्या होत्या. महिलांसाठी दिलेल्या या आरोग्य सुविधांसाठी यावेळी डॉक्टर सविता डेरे( बी ए एम एस, सी जिओ) पारिवारिक चिकित्सक आणि स्त्री रोग तज्ञ वैद्य हेमलता श्री वैशंपायन (एम डी योग पंचकर्म व गर्भसंस्कार तज्ञ) मिसेस दीप्ती डी.पाटील (पोषण विशेषज्ञ वजन कमी करणे संतुलित आहार व पचन संस्था सल्लागार)महिलांच्या आरोग्य तपासणीच्या या शिबिरात २५ ते ३० महिलांनी सहभाग घेऊन आपले शरीर चिकित्सा करण्यासाठी सहभाग घेतला.सदरचे शिबीर यशस्वी करण्यासाठी प्रज्ञा लाघवे , व श्रध्दा जाधव कल्पवृक्ष द्रोणागिरी यांचे योगदान महत्त्वाचे आहे.

## चिपळे गृप ग्राम पंचायत, पनवेल अंतर्गत पाच गावांची नैना विरोधात सर्वकष याचिका दाखल

दैनिक युवक आधार
**नवीन पनवेल आधार** : नैना विरोधात चिपळे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील पाच गावांची सर्वंकष याचिका दाखल करण्यात आली. पनवेल तालुक्यातील 23 गावांत नैना योजनेंतर्गत शहर नियोजन योजना राबविण्यात येत आहे. यासाठी राज्य सरकारने 2013 साली सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली. या योजनेनुसार सिडको शेतकर्यांकडील 60% टक्के जमीन विनामूल्य घेऊन 40% जमीन शेतकर्यांच्या ताब्यात राहणार आहे. ही केवळ जमीन बळकावणारी योजना असल्यामुळे मागील पंधरा वर्षांपासून येथील शेतकरी त्यास विरोध करत आहेत. 23 गावांतील सर्व ग्रामपंचायतींनी सदरहू नैना योजनेस विरोध दर्शवणारे ठराव मंजूर करून घेतले आहेत. आमचा विकासाला विरोध नाही. परंतु आमच्या जमीनी 2013 च्या नवीन भूसंपादन कायद्यातर्गत संपादित करण्यात याव्यात किंवा सदरहू गावे पनवेल महानगरपालिकेत समाविष्ट करावीत तसेच मूळ गावठाणाबाहेरील सर्व घरे नियमित करावीत अशा शेतकर्यांच्या प्रमुख मागण्या आहेत. सदरहू मागण्यांना अनुसरून आजपर्यंत मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली नव्हती. विहीघर येथील माजी जिल्हा परिषद सदस्य विलास फडके यांनी पुढाकार घेऊन चिपळे, विहिघर, भोकरपाडा, बोनशेत आणि कोप्रोली या चिपळे गृप ग्रामपंचायत अंतर्गत पाच गावांच्या वतीने वरील मागण्यांना अनुसरून 27 फेब्रुवारी रोजी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.रस्त्यावरील लढ़ाई सोबतच महत्वपूर्ण अशी कायदेशीर लढ़ाईचा पर्याय शेतकऱ्यांनी निवडला आहे. नैना योजना हा एक मोठा जमीन घोटाळा असून शेतकर्यांना बिल्डरांच्या दावणीला बांधणारा आहे असा आरोप केला जात आहे. तसेच सरकारने 73 व्या घटना दुरूस्ती अन्वये ग्रामपंचायतींना दिलेल्या अधिकारांवर अतिक्रमण केलेले आहे, या योजनेत सार्वजनिक हित नाही इत्यादी मुद्दे याचिकेत समाविष्ट करून सदरहू नैना योजना रद्द करण्याची मागणी याचिकेत केली आहे. अशाप्रकारे सर्वकष याचिका दाखल झाल्यामुळे ग्रामस्थांमध्ये न्याय मिळण्याची आशा निर्माण झाली असून उर्वरित गावांनीही याच याचिकेच्या आधारे उच्च न्यायालयात दाद मागण्याची तयारी दर्शविली आहे. माजी न्यायमूर्ती बी.जी. कोळसेपाटील यांच्या सल्ल्यानुसार ज्येष्ठ विधिज्ञ एड सुनिप सेन यांच्या मार्गदर्शनाखाली एड.प्रभाकर जाधव आणि एड.विजय गडगे यांनी ही याचिका दाखल केली आहे. याकामी सुधाकर पाटील, माजी महसूल अधिकारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले असून नामदेवशेठ फडके, बाळाराम फडके,गजानन पाटील, बबन फडके, धनंजय पाटील, राज पाटील, रामचंद्र फुलोरे, एड राजेन्द्र मढवी यांचाही सहभाग राहिला आहे.

# कळंबोली वसाहती मधील बैठ्या चाळी पावसाळ्यात होणार जलमय

## होल्डिंग पॉन्ड लगतच्या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण न करण्याची विजय खानावकर यांची मागणी

दैनिक युवक आधार
**पनवेल वार्ताहर** : पनवेल महापालिकेमार्फत सिडको वसाहती मधून नवीन रस्ते बांधणी सुरू आहे.त्या अनुषंगाने कळंबोली येथील केएलई कॉलेज ते विसर्जन तलाव रोडपाली, मार्गावर कॉंक्रिटीकरण न करता डांबरीकरण करण्याची मागणी मा. नगरसेवक खानावकर यांनी पालिकेकडे केली आहे.अदर्श शहराचे स्वप्न साकारणाऱ्या पनवेल महापालिकेने विविध विकास कामामध्ये प्रामुख्याने पनवेल महापालिका क्षेत्रातील सिडको नोडमधील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करण्याचे काम गेल्या वर्षभरापासून पालिकेने हाती घेतली आहे. त्यामुळे कॉलनीतील मुख्य रस्ते खड्डेमुक्त होणार आहेत. त्याच बरोबर 'कळंबोली नोड मधील विविध रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण व पुनर्पृष्ठीकरण', करण्याचे



काम कासव गतीने सुरू आहे. याच कामाचा भाग असलेल्या केएलई कॉलेज ते विसर्जन तलाव रोडपाली, मार्गावर कॉंक्रिटीकरणाचे काम सुरू आहे. परंतु आधीच समुद्र सपाटीपासून खोल असलेली वसाहत या उंच कॉंक्रिटीकरणामुळे पुन्हा जलमय होणार आहे. त्यामुळे या बैठ्याचाळीलगत असलेल्या रस्त्यावरचे

**कळंबोली वसाहत ही समुद्रसपाटीपासून खोल असून दरवर्षी पावसाळ्यामध्ये वसाहतीमध्ये पाणी भरते. मागील वर्षापासून पालिकेने वसाहतीमधील रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण सुरू केले आहे त्यामुळे रस्त्यांची उंची वाढली असून वसाहती खोल झाले आहेत त्यामुळे यंदाच्या पावसाळ्यात वसाहतींची आणखी दैना होणार आहे त्यामुळे होल्डिंग पॉन्ड लगतच्या रस्त्याचे सिमेंटकरण न करता आहे तोच रस्ता डांबरीकरण करावा अशी मागणी पालिके कडे केली आहे.**
**विजय खानावकर**
**माजी नगरसेवक कळंबोली प्रभाग.10**

कॉंक्रिटीकरण कॉंक्रिटीकरणामुळे उंची वाढणार आहे. त्यामुळे ठिकाणाहून पाण्याचा निचरा होण्यासाठी जागा उरणार नाही. परिणामी नेहमीच पावसाळ्यात जलमय होणाऱ्या या बैठक चाळीतील घरांना आणखी पावसाळ्यात घरात पाणी शिरण्याचा त्रास होणार आहे. ही बाब नगरसेवक विजय खानावकर यांच्यासह बैठ्या चाळीतील नागरिकांनी पनवेल पालिकेच्या लक्षात आणून दिली असून या ठिकाणी सिमेंटचा रस्ता न बांधता पूर्वीच्या रस्त्याचे डांबरीकरण करण्याची मागणी माजी नगरसेवक विजय खानावकर व नागरिकांनी पनवेल पालिकेचे मुख्य अभियंता संजय कटेकर यांच्याकडे केली आहे. यावेळी प्रभाग क्रमांक दहा मधील बैठ्या चाळीतील महिला व नागरिक उपस्थित होते.

## उप अधीक्षक यांच्या ओळखीचा तक्रारदारावर प्रभाव पाडत शिपायाने मागितली तब्बल ४०००००/- रुपये लाच,

### तडजोडीअंती ३५००००/- रुपये घेताना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात !

दैनिक युवक आधार
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे । निफाड** : येथील आलोसे नितेन्द्र काशिनाथ गाडे, शिपाई, उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, निफाड, ता. निफाड, जि. नाशिक यास साडेतीन लाख रुपये स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या वतीने ताब्यात घेण्यात आले.तक्रारदाराच्या मावशीची मौजे दीक्षि, तालुका निफाड येथे शेतजमीन असून सदर शेत जमीन मोजणीसाठी भूमी अभिलेख कार्यालय निफाड येथे २५ जानेवारी रोजी अर्ज केला होता. तक्रारदार यांनी



वारंवार पाठपुरावा केल्यानंतर सदर जमिनीची भूमि अभिलेख कार्यालय येथून दिनांक २८ फेब्रुवारी २०१८ रोजी मोजणी झाली होती परंतु हद्दी खुणा दाखवायच्या बाकी होत्या, लोकसेवक शिपाई गाडे यांनी श्री भाबड, उप अधीक्षक, भूमी अभिलेख यांच्या ओळखीचा तक्रारदार यांच्यावर प्रभाव पाडून भाबड यांच्याशी बोलून सदरचे काम दिलेल्या तारखेस दिनांक ७ मार्च २०२५ रोजी हद्दी खुणा दाखवून व नकाशा काढून काम पूर्ण करून देण्याच्या मोबदल्यात दिनांक ६ मार्च रोजी स्वतःसाठी व भाबड साहेब यांच्या नावे ४०००००/– रुपये लाचेची मागणी केली व तडजोडी अंति ३५००००/– रुपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम दिनांक ७ मार्च रोजी स्वीकारल्यानंतर त्यांना रंगेहाथ विभागाच्या वतीने ताब्यात घेण्यात आले.

## जागतिक महिला दिन व वाढदिवसानिमित्त महाविद्यालयात वृक्षारोपण



दैनिक युवक आधार
**सणसर । विकास क्षत्रिय** : भवानीनगर येथील श्री छत्रपती कला वाणिज्य महाविद्यालय भवानीनगर येथे जागतिक महिला दिन व श्री. छत्रपती शिक्षण संस्था अध्यक्ष मा. प्रशांत दादा काटे यांच्या वाढदिवसानिमित्त 51 झाडे महाविद्यालयातील प्राचार्या व महिला प्राध्यापक यांच्या हस्ते लावण्यात येऊन उपक्रम साजरा करण्यात आला.यावेळी प्राचार्या शिवाली माने देशमुख यांनी महिला दिनानिमित्त महाविद्यालयातील मुलींना मार्गदर्शन केले व महिला दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी प्राचार्या शिवाली माने देशमुख,सोनाली वाघमारे,रश्मी चव्हाण,स्वाती केंगार,अंकिता थोरात,शिवानी काटे,प्रणाली होरणे,प्रभावती रणसिंग,अर्पिता जगताप,पूजा भोईटे, हर्षदा वानखेडे आदी महिला प्राध्यापक वर्ग व सर्व शिक्षक,इतर कर्मचारी उपस्थित होते.

## सारोळेथडी येथे ६४ वा अखंड हरिनाम सप्ताह उत्साहात सुरू



दैनिक युवक आधार
**निफाड प्रतिनिधी । राहुल कुलकर्णी** : निफाड तालुक्यातील गोदावरी नदीच्या काठावर वसलेले सारोळेथडी येथे ६४ व्या अखंड हरिनाम सप्ताहाचे मिती फाल्गुन शुद्ध ५मंगळवार दि. ०४/०३/२०२५ पासून सुरूवात झाली. असून मिती फाल्गुन शुद्ध १२ मंगळवार दि. ११/०३/२०२५ पर्यंत असणार असून योगीराज वैकुंठवासी प. पु. तुकाराम बाबा खेडलेकर. वैकुंठवासी हरी. भक्त. परायण. गुरुवर्य माऊली बाबा, वैकुंठवासी ह. भ. प. काशिनाथ महाराज खराटे यांच्या आशिर्वादाने......!

ह. भ. प. वैकुंठवासी. तुळशीराम म. नागरे, ह. भ. प. गणपत महाराज नागरे सारोळेथडी भगरी बाबा बाल संस्कार आश्रम बोकडदरे ह. भ. प. रघुनाथ महाराज खटाणे खेडलेझुंगे, ह. भ. प. ज्ञानेश्वर माऊली सरकटे हिंगोली कर यांच्या मार्गदर्शनाखाली ६४ व्या अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.यावेळी महाराष्ट्रातील नामवंत, प्रसिद्ध संत मंडळीचे सुश्राव्य किर्तन होणार आहे. आळंदी येथील वारकरी शिक्षण संस्थेचे मृदुंग वादक, गायक उपस्थित राहणार आहे. विनापुजन व कलश पूजनाने सप्ताहाचे सुरूवात झाली.पहिल्याच दिवशी श्री. ह. भ. प. वैष्णव महाराज जाधव आळंदी यांचे सुश्राव्य किर्तन संपन्न झाले. यावेळी गावातील व पंचक्रोशीतील बहुसंख्येने महिला पुरुष भाविकांची उपस्थिती लाभली. सप्ताहात ह. भ. प. श्री. निवृत्ती महाराज चव्हाण ठाणगाव, ह. भ. प.श्री.भगवान महाराज सावंत जालना, ह. भ. प. श्री. शाम महाराज ठोंबरे आळंदी, ह. भ. प. श्री. अर्जुन महाराज खाडे आळंदी, ह. भ. प. श्री. रमेश महाराज वाघ आळंदीह. भ. प. श्री. रघुनाथ महाराज खटाणे खेडलेझुंगे तुकाराम बाबा संस्थान यांचे किर्तन होणार आहे. तर काल्याचे किर्तन ह. भ. प. सरकटे माऊली हिंगोली यांचे होईल. ज्ञानेश्वरी पारायण संजय महाराज शास्त्री, संगीत विशारद गणेश गुरूजी मृदुंगाचार्य हरी महाराज धोगरड आळंदी गायनाचार्य अनिल महाराज , किसन महाराज, झेंडे महाराज आळंदी विवेकी शांताराम भाऊ नागरे, काकडा नानाभाऊ बैरागी, बाळासाहेब नागरे पहारेकरी शंकर बापू निंबाळकर भालदार चोपदार दगु बाबुराव नागरे निवृत्ती सुर्यवंशी, तान्हाजी नागरे असुन या सप्ताहाचे आयोजक ह. भ. प. गणपत बाबा नागरे असून पंचक्रोशीतील भजनी मंडळ आपली सेवा देत आहे. काल्याचे किर्तनानंतर महाप्रसादाचे आयोजन असून दशरथ कारभारी भालेराव व हौशीराम कारभारी भालेराव बंधू अन्नदान करीत असल्याचे भजनी मंडळाचे सदस्य सुरेश नागरे, शिवाजी राजे नागरे,अशोकराव सदाशिव नागरे यांनी आमच्या प्रतिनिधी शी बोलताना सांगितले.

# महिलांच्या हस्ते राज्य पुष्प जारूळ वृक्षाचे रोपण

## संगोपणाची दोरी ही सांभाळली



दैनिक युवक आधार
**प्रतिनिधी । योगेश पालोदकर**
**सिल्लोड** - वृक्षारोपण व संवर्धन कार्यात महिलांचा सहभाग असावा, हरीत महाराष्ट्र घडवण्यात त्यांचे योगदान लाभावे या हेतूने श्रीमती कीर्ती जमदाडे– कोकाटे,विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरन विभाग, छत्रपती संभाजी नगर यांच्या मार्गदर्शनाखाली सिल्लोड येथील अभिनव प्रतिष्ठानचे वृक्ष संवर्धक व राज्यपुष्पाचे राज्यभर रोपण करण्याचे अभियान राबविणारे डॉ. संतोष पाटील व सामाजिक वनी करन विभागाचे वन परीक्षेत्र अधिकारी शेषराव तांबे यांच्या सहयोगाने महिला दिनाच्या निमित्ताने आज शहरातील विविध ठिकाणी राज्यपुष्प जारूळचे रोपण करण्यात आले. जारूळच्या फुलास " क्वीन्स फ्लॉवर" म्हणजेच राणीचे फुलं असे ही म्हटले जाते व ते आपल्या राज्याचे हरीत मानचिन्ह ही आहे. समाजातील विविध स्तरावरील महिलांना वृक्षारोपणाचा बहुमान मिळावा या भावनेने यशवंतराव चव्हाण महाविद्यालच्या प्रा.डॉ. रुपाली पालोदकर, प्रा. डॉ.सुनीता सावदेकर,छत्रपती शिवाजी नगर येथील माँ दुर्गा देवी महिला मंडळा च्या सर्व सदस्या, वनरक्षक पूजा परदेशी, आदींच्या हस्ते रोपण शहर व तालुक्यात विविध 10ठिकाणी रोपण करण्यात आले.

**सिल्लोडच्या भगिनींचे कार्य राज्यास प्रेरणादायी : जारूळ - तामन या राज्य पुष्प रोपणाचे कार्य मोठ्या प्रमाणात सिल्लोड तालुक्यातील अनेक शाळा व विविध ठिकाणी रोपण झाले आहे. जैवविविधता संवर्धन हेतू हे कार्य हरीत महाराष्ट्र करण्यास प्रेरणादायी आहे.- श्रीमती कीर्ती जमदाळे- कोकाटे, विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरन विभाग, छत्रपती संभाजी नगर,**

# महिला संरक्षणासाठी आणखी कठोर कायदे करण्याची आवश्यकता

दैनिक युवक आधार
**प्रशांत तांबोळकर । लातुर**

शिरूरआनंतपाळ :८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त श्री. छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक वाचनालय, शिवपूर ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे महिला कायदेविषयक जनजागृती कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख मार्गदर्शक अड. सौ. वर्षा शिंदे व प्रमुख पाहुण्याच्या हस्ते करण्यात आले.याप्रसंगी वाचनालयाच्या वतीने प्रमुख पाहुण्यांचा ग्रंथ, पुष्पगुच्छ व वृक्ष भेट देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यशाळेच्या प्रसंगी अड. सौ. वर्षा शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना. आज ही महिलांवर होणाऱ्या समाजातील, नोकरीच्या ठिकाणी, शाळा, महाविद्यालयाच्या ठिकाणी होत असलेल्या अत्याचाराबद्दल विचार करताना समाजातील कुकृत्य करणाऱ्या नराधमांना कठोर शिक्षा होण्यासाठी व पुन्हा पुन्हा महिलांवर होणारे अत्याचार किंवा संपत्तीवरील आपले हक्क मागणी व पती–पत्नी यांच्यातील वाढते तणाव या सर्व बाबीवर अंकुश ठेवण्यासाठी महिलांसाठी कठोर कायदे करण्याची अत्यंत आवश्यकता आहे व आपल्या पाल्यास योग्य नागरिक घडविण्याची जबाबदारी महिलावरच आहे या सर्व बाबींचा विचार करून महिला विषयाचे संरक्षण व हक्क कायदे आणखी कठोर होण्याची गरज आहे असे मत त्यांनी याप्रसंगी व्यक्त केले.महिला प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर राहुन देशाला आर्थिक महासत्ता बनविण्यासाठी महिलांचे फार मोठे योगदान लाभत आहे असे मत कार्यक्रमाच्या अध्यक्ष्या सौ गोकर्णा सूर्यवंशी यांनी व्यक्त केले.या कार्यशाळेस सौ.रंजना तपसाळे सौ.अनुसया भंगूरे सौ.वत्सल्ला चात्रे सौ. रेणुका पांचाळ सौ. अनुराधा इंगळे सौ.शेवंता वडमिले सौ. कुलसूम शेख सौ. संगीता पिटले सौ रंजना तोरणे श्रीमती शकुबाई गोडपटले सौ. संजीवनी कांबळे सौ. भाग्यश्री जाधव यांच्यासह गावातील महिला व महिला वाचक सभासद यांची प्रमुख उपस्थिती होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. भाग्यश्री जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन सौ.अनुसया भंगूरे यांनी केले.



# जागतिक महिला दिनाचा व ग्रामसभेचा रेवदंडा ग्रामपंचायतीला पडला विसर ?

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा** : राज्यभरातील ग्रामपंचायतींनी बोलवली 'विशेष ग्रामसभा'; महिला दिनाच्या निमित्ताने महिला सुरक्षेचा ठराव मांडणार. पण रेवदंडा ग्रामपंचायतीला रायगड जिल्हा परिषद व पंचायत समिती अलिबाग यांच्याकडुन जागतिक महिला दिनाचं परिपत्रक मिळालेच नाही का ? किंवा दुसरा शनिवार सार्वजनिक सुट्टीचा असल्यामुळे रेवदंडा ग्रामपंचायत बंद आहे का अशी शंका ग्रामस्थांमध्ये जोरदार चालू आहे प्रत्यक्षात रेवदंडा ग्रामपंचायतशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता ग्रामपंचायत बंद होती .रेवदंडा ग्रामपंचायतला जागतिक महिला दिनाचा विसर पडला अशी रेवदंडा मध्ये सर्वत्र चर्चा सुरू आहे याबाबत मिळालेल्या माहितीच्या आधारे महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर म्हणाल्या की, पुरोगामी व प्रगत राज्य असलेल्या महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर बालविवाह होत आहेत. महिला सर्वच क्षेत्रात आघाडीवर असतानाही, विधवा महिलांना रुढी व अंधश्रद्धेमुळे जाचक प्रथांना सामोरे जावे लागते आहे. या सोबतच महिलांच्या सुरक्षिततेसाठी व्यापक स्तरावर जनजागृती व्हावी यासाठी विशेष ग्रामसभा बोलावून गावात बालविवाह होउ न देणे, पतीच्या निधनानंतर महिलांना जाचक असणार्या प्रथा बंद करणे, गावात मुलींचा जन्मदर वाढावा यासाठी प्रयत्न करणे आणि महिलांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना करणे असे ठराव करण्यात यावे अशी आयोगाची संकल्पना आहे. संपुर्ण गावात असे ठराव शासकीय पातळीवर झाल्यास जनसामान्यांच्या मनात महिलांना सन्मानाने




वागवणे ही कर्तव्य भावना रुजवता येईल. महिलांना सन्मानाची वागणूक देत त्यांच्याकडे पाहाण्याचा दृष्टीकोनही अशा प्रयत्नांतून बदलेल म्हणून आयोगाने ही संकल्पना मांडल्याचे त्यांनी सांगितले. विशेष ग्रामसभा आयोजित करण्यास निर्देश दिल्याबद्दल त्यांनी राज्याचे ग्रामविकास मंत्री श्री. जयकुमार गोरे व राज्याच्या महिला व बालविकास मंत्री कु आदिती तटकरे यांचे आभार मानले आहेत. राज्यात पहिल्यांदाच महिलांच्या विषयांकरिता विशेष ग्रामसभा घेण्याचा निर्णय झाल्याने महिला सक्षमी करणाच्या दृष्टीने हा महत्त्वाचा पाऊल असल्याचेही त्यांनी सांगितले. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत उद्या 8 मार्च रोजी राज्यभरातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये विशेष ग्रामसभा आयोजित करण्यात येणार आहेत. महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या संपल्पनेनुसार बालविवाह रोखणे, विधवा प्रथा बंद करणे तसेच महिला सुरक्षिततेसाठीचे ठराव या ग्रामसभांमध्ये करण्यात येणार आहेत. महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने केलेल्या मागणीनुसार ग्रामविकास विभागाने राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना 8 मार्च रोजी, जागतिक महिला दिनानिमित्त सर्व ग्रामपंचायतीमध्ये विशेष ग्रामसभा आयोजित करण्याचे निर्देश 6 मार्च 2025 रोजीच्या पत्रान्वये दिले आहेत. राज्यात महिलांवरील अत्याचार आणि महिला सुरक्षेचा मुद्दा गंभीर बनला असता या निर्णयाचे स्वागत होत आहे.दरम्यान, राज्य महिला आयोगाने 28 फेब्रुवारी 2025 रोजी याबाबत कार्यवाही करण्याकरिता ग्रामविकास विभागाला पत्राद्वारे कळविले होते. तसेच केंद्र शासनाच्या पंचायती राज विभागाच्या अपर सचिवांनी देशातील सर्व राज्यातील ग्रामविकास सचिवांना 21 फेब्रुवारी 2025 रोजीच्या पत्रान्वये जागतिक महिला दिनानिमित्त महिला सभा आयोजित करण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्यानुसार शासनाकडून कार्यवाही करण्यात आली आहे.

# निफाड सायकलीस्ट वतीने महिला दिनानिमित्त 14 किमी सायकल राईड





**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी । राहुल कुलकर्णी** : जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत निफाड सायकलीस्टच्या वतीने निफाड उगाव हिंगलाज माता मंदिर खेडे अशी सायकलिंग आयोजित करण्यात आली होती. ऊगाव रोड येथील तुळजाभवानी मंदिर येथून स्व शांतीलाल सोनी निफाड नागरी पत संस्था अध्यक्ष श्री अशोकराव पोफळीया व मा नगरसेवक देवदत्त कापसे यांनी झेंडा दाखवुन राईडसाठी शुभेच्छा दिल्या. या राईड मध्ये सौ प्रिया चोरडिया, सौ आरती मोगल, सौ मनिषा वाघ, सौ शैला व्यवहारे, डॉ सीमा डेर्ले, सौ पूजा मगर, सौ मंगल जावरे, सौ नेहा सोनवणे आदी महिलांनी सहभाग नोंदवला. याप्रसंगी झाडे लावा झाडे जगवा, जल है तो कल है, बेटी बचाव बेटी पढाव, सायकल चालवा पर्यावरण वाचवा, मुलगी शिकली प्रगती केली, हम फिट तो देश फिट याद्वारे प्रबोधन करण्यात आहे. याप्रसंगी निफाड सायकलीस्ट चे राजाभाऊ गवळे, संदीप गवळी, अथर्व नकाते, दिपक बोरसे, प्रविण तनपुरे, अशोक कोल्हे यांनीही सहभाग नोंदविला व महिला सायकलीस्ट बरोबर सायकल राईड केली.

# पनवेलमधील जेके प्लाझा कमर्शिअल कॉम्प्लेक्समध्ये भीषण आग

## सहा दुकाने जळून खाक

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)** : पनवेल शहरातील मिडल क्लास हौसिंग सोसायटी दुर्गामाता मंदिरासमोर असलेल्या जेके प्लाझा कमर्शिअल कॉम्प्लेक्समध्ये आज सकाळी अचानकपणे आग लागून फर्निचरची सहा दुकाने जळून खाक झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळ असनलेल्या जेके प्लाझा कमर्शिअल कॉम्प्लेक्समध्ये असलेल्या बंद सहा फर्निचरच्या दुकानांना अचानकपणे आग लागली. या आगीने रौद्ररुप धारण केले होते व त्याचा फटका सदर कॉम्प्लेक्समध्ये असलेले हॉस्पिटल तसेच इतर खाजगी कार्यालयांना बसणार होता. परंतु पनवेल महानगरपालिकेच्या अग्नीशमन दलाच्या पथकाला या घटनेची माहिती मिळताच त्वरित घटनास्थळी येवून शर्तीचे प्रयत्न करून 20 ते 25 मिनिटात आग आटोक्यात आणली. तेव्हा नागरिकांना हायेसे वाटले. सदर आग ही शॉर्ट सर्कीटमुळे लागली असल्याचा प्राथमिक अंदाज वर्तविला आहे. या आगीत करोडो रुपयाचे नुकसान झाल्याचे समजते.



# बुद्धगया महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात द्या-अनिल गांगुर्डे

**दैनिक युवक आधार**
**उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक। । विनोद गायकवाड**
दिनांक 7/3/2025 शुक्रवार रोजी भिमटोला सामाजिक संघटनेच्या वतीने जिल्ह्याचे अप्पर जिल्हाधिकारी बाबासाहेब पारधे यांची भेट घेऊन वरील विषयाचे निवेदन देण्यात आले. निवेदनाचा आशय असा आहे की बिहार राज्यातील गया येथील महाबोधी महाबुद्ध विहाराच्या मुक्तीसाठी गेल्या अनेक वर्षापासून लढा सुरू आहे गौतम बुद्धांना ज्ञानप्राप्ती झालेल्या या पवित्र भूमीवरील विहाराचा ताबा भारतीय भिख्खूं कडे द्यावा यासाठी सनदशीर मार्गांनी लढा उभारण्यात आला आहे मात्र सरकार या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहत नसल्याचे वारंवार दिसून आले आहे विहाराचा ताबा इतर धर्मियांकडे देऊन बुद्ध संस्कृती नष्ट करण्याचे प्रयत्न होत आहे इतर धर्माचे हिंदू मंदिरे हिंदूंकडे ख्रिश्चन धर्माचे चर्च ख्रिस्ती बांधवांकडे गुरुद्वारे शीख बांधवांकडे मस्जिद मुसलमानांकडे तर बौद्ध विहार इतरांकडे कसे असे निवेदनात



म्हटले आहे हा प्रश्न ऐरणीवर आला असून लवकरात लवकर कायद्यात बदल करून महाविहार बौद्धांकडे सोपवावे.अन्यथा देशभर तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल याची प्रशासनाने नोंद घ्यावी.याप्रसंगी भीमटोला सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अनिल गांगुर्डे, जिल्हाप्रमुख चंद्रशेखर बहाळकर, प्रसिद्धीप्रमुख प्रतीक सोनटक्के, जिल्हा नेते राजेंद्र भडके, जिल्हा नेते पांडुरंग कांबळे, युवा नेते प्रशांत गांगुर्डे आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

================

# रामचंद्र म्हात्रे विद्यालयात चष्मा वाटप शिबीर व राष्ट्रीय महिला दिन संपन्न

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख । एम.डी.भोईर**
उरण तालुक्यातील आवरे येथील ज्ञान प्रसारक शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षकमित्र प्राचार्य बाळासाहेब म्हात्रे यांच्या स्मृती दिनानिमित्त २१ जानेवारी २०२५ रोजी रामचंद्र म्हात्रे विद्यालय अॅन्ड ज्युनियर कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अॅन्ड कॉमर्स येथे आर. झुनझुनवाला आय हॉस्पिटल पनवेल यांच्या सहकार्याने आयोजित केलेल्या मोफत नेत्र चिकित्सा शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी ७२५ विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. ज्या विद्यार्थ्यांमध्ये नेत्र दोष आढळला त्यांना ८ मार्च या राष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून मोफत चष्मा वाटप करण्यात आले. मोफत चष्मा वाटप आणि राष्ट्रीय महिला दिनानिमित्त कार्यकामासाठी उपस्थित असलेल्या सर्व महिला मान्यवर, शाळेतील सर्व शिक्षिका व शिक्षकेत्तर महिला यांचा भेटवस्तू व गुलाब पुष्प देवून सन्मान करण्यात आला. यावेळी इयत्ता सहावी मधील विद्यार्थीनी माही भोसले हिने महिला दिनावर आधारित स्वरचित कविता सादर केली. यावेळी आवरे ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंच श्रीमती निराताई पाटील, श्रेया अॅकॅडमीच्या अध्यक्षा सौ. स्मिता म्हात्रे, सौ. राजश्री गावंड, आर. झुनझुनवाला आय हॉस्पिटलच्या सौ. ज्योती पाटील, प्राचार्य सुभाष ठाकूर, सर्व महिला शिक्षिका व सर्व महिला शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थीनी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेखर म्हात्रे तर आभार प्रदर्शन राजेंद्र शिंदे यांनी केले.




# कमळ महिला पतसंस्था कोकण पतसंस्था भूषण पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर** : कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनेवल ही रायगड जिल्हयातील एक नावाजलेली आदर्श महिला पतसंस्था गेली एकोणतीस वर्षे ग्राहकांना उत्तम सेवा प्रदान करीत आहे. संस्थेने केलेली सातत्यपूर्ण प्रगती आणि गुणवत्ता सिध्दतेमुळे कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल या संस्थेला रू. २५ कोटी ते पुढे या व्यवसाय गटातून २०२४-२५ सालाकरीता प्रथम क्रमांकाचा “कोकण पतसंस्था भूषण पुरस्कार" देऊन गौरव करण्यात आला. अलिबाग येथे "कोकण पतसंस्था भूषण पुरस्कार" २०२४- २५" हा समारंभ पार पडला. सदर समारंभासाठी अनिलज कवडे आयुक्त, महाराष्ट्र राज्य निवडणूक प्राधिकरण, पुणे, शैलेश कोतमिरे निवृत्त सहकार आयुक्त, पुणे हे उपस्थित होते. काकासाहेब कोयटे, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन, तसेच गिरीश तुळपुळे, अध्यक्ष कोकण विभाग नागरी सहकारी पतसंस्था संघ यांच्या हस्ते सदर पारितोषकाचे मानचिन्ह कमळ महिला नागरी पतपेढीच्या अध्यक्षा मालती आंग्रे, उपाध्यक्षा पूर्वा खेडेकर, संचालिका मनिषा विसपूते, उर्मिला वंजारी, संस्थेचे प्रशासकीय व्यवस्थापक दिपक राजे तसेच संस्थेचा कर्मचारी वर्ग यांनी स्वीकारला. या पुरस्कारामुळे कमळ महिला पतसंस्थेचा तसेच संस्थेच्या संचालकांचे व संस्थेचे अधिकारी, कर्मचारी यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



# नांदेड परिसरात रेल्वे कोच निर्मितीसाठी चाचपणी

## खासदार अशोकराव चव्हाण यांनी केला पाठपुरावा

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी । चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**
नांदेड नांदेडात वंदे भारत, अमृत भारत किंवा एलएचबी कोचचा निर्मिती प्रकल्प उभारण्याबाबत चाचपणी सुरु झाली आहे. दक्षिण मध्य रेल्वेने याविषयी नांदेड विभागीय रेल्वे कार्यालयाकडून अहवाल मागवला आहे. माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी ही मागणी रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली होती.खा. अशोकराव चव्हाण यांनी जानेवारीत रेल्वे मंत्र्यांना नांदेड परिसरात रेल्वे डब्यांचा नवा कारखाना उभारण्याची मागणी करताना या प्रकल्पासाठी नांदेड परिसर सर्वांगीणरित्या सुयोग्य असल्याचे सूचित केले होते. नांदेडचे भौगोलिक स्थान मध्यवर्ती असून, रस्ते, रेल्वे व हवाई मार्गाने चांगली कनेक्टिव्हिटी उपलब्ध आहे. नांदेड परिसरात मोठ्या प्रमाणात जमीन व पाणी उपलब्ध आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशभरातील रेल्वेच्या पायाभूत बळकट करण्याचे काम वेगाने सुरु आहे. त्यामुळे वंदे भारत, अमृत भारत व एलएचबी कोचची मोठ्या प्रमाणात आवश्यकता असून, ही वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी या कोचेसच्या निर्मितीचा प्रकल्प नांदेड परिसरात सुरु करावा, अशी मागणी खा. अशोकराव चव्हाण यांनी केली होती. त्यांच्या मागणीची रेल्वे मंत्र्यांनी तातडीने दखल घेत माहिती संकलन सुरु केले आहे. उपलब्ध माहितीनुसार, दक्षिण मध्य रेल्वेने नांदेड विभागीय कार्यालयाकडून याबाबत अहवाल मागवला आहे.

